# मेघे महाविद्यालयाच्या एमबीए विद्यार्थ्यांची गरुडझेप



यशस्वी विद्यार्थ्यांसह प्राध्यापकवृंद

◆ **अमरावती, १७ जुलै**

प्रो. राम मेघे महाविद्यालयाच्या एमबीए विभागातर्फे अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांकरता घेण्यात आलेल्या कॅम्पस प्लेसमेंट दरम्यान विद्यार्थ्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये तब्बल ६१ नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. यामध्ये जस्ट डायल, वॉलमार्ट, आयसीआयसीआय सिक्युंरिटीज, कार्वी सेक्युरिटीस, रिपल्स अ‍ॅड्व्हायझरी, वीवो ओबिलेस, ओप्पो स्मार्टफोन, टाटा ट्रस्ट, पिन्नाकुलम सल्यूशन्स, रिसर्च ईन, नेटवर्क कॅपिटल, लिबेन लाइफ सायन्स, उत्कर्ष फाइनान्स इत्यादींचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना सर्वोत्तम मार्गदर्शन आणि त्यांच्या उत्तम भविष्यसाठी योग्य त्या क्षेत्रात नोकरीच्या संधी मिळवून देण्याचे काम आम्ही सातत्याने करीत आहोत व ही परंपरा पुढेही अशीच चालू राहील याची मी हमी देतो, असे प्रतिपादन राम मेघे इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. ए. पी. बोडखे यांनी केले.

पदव्युत्तर शिक्षण घेऊन व्यवसाय क्षेत्रात आपले भविष्य घडविण्यासाठी विद्यार्थी एम.बी.ए.ला प्रवेश घेतात. विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांच्या देखील आमच्याकडून प्रचंड अपेक्षा असतात. या प्रकारे कॅम्पस प्लेसमेंटमधून त्यांना मिळालेल्या नोकरीच्या संधी ही त्याच अपेक्षांची पूर्तता आहे. विद्यार्थ्यांचे हे यश आम्ही घेतलेल्या परिश्रमाची पावती आहे, असे एम.बी.ए.चे विभागप्रमुख प्रा. आशिष देशमुख यांनी विशद केले. या प्रसंगी राम मेघे इन्स्टिट्यूटमधील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. निक्कू खालसा आणि एमबीएचे समन्वयक प्रा. निनाद गावंडे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाचा आम्हाला अभिमान वाटतो. विद्यार्थ्यांनी त्यांच्या करीअरमध्ये असेच यशस्वी मार्गक्रमण करावे, हीच सदिच्छा, या शब्दात विदर्भ यूथ वेलफेर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीनजी धांडे यानी विद्यार्थ्यांचे आणि एम.बी.ए. विभागाचे अभिनंदन केले.

तसेच विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे उपाध्यक्ष अ‍ॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी आणि कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, शंकरराव काळे, प्रा. रागिनी देशमुख, डॉ. वैशाली धांडे आणि प्रा. डॉ. पूनम चौधरी यांनी देखील विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

CENTRAL LIBRARY, PRMIT & R, BADNERA